# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
## पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग औरंगाबाद

दुरध्वनी क्र. : 0240-2392100भारतमाता चौक, पोलीस कॉलनी रोड, डीसीटीसी इमारत, औरंगाबाद-431 003.

Email ID : sp.railway-abad@mahapolice.gov.in


जा.क्र. पोअलोऔ/पो.भरती/2021/अंतिम सुधा. निवड यादी-प्रतिक्षा यादी/2023 औरंगाबाद दिनांक 27/05/2023.

**उमेदवारांकरीता शुध्दीपत्रक**

पोलीस अधीक्षक लोहमार्ग, औरंगाबाद या कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती-2021 ची तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी दिनांक 17/04/2023 रोजी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संकेस्तस्थळावर रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

1. तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादीमध्ये उमेदवार नामे **शुभम रंगराव लग्गड चेस्ट क्र.** 2397 या ओपन अनाथ उमेदवारास शारिरीक व मैदानी चाचणी मिळुन एकुण 102 गुण असल्याने त्याची गुणवत्तेप्रमाणे ओपन अनाथ या प्रवर्गातुन तात्पुरत्या निवड यादीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात आली होती. **परंतु शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दिनांक 06/04/2023 अन्वये** अनाथ आरक्षण प्रवर्गासाठी उपलब्ध जागा विषम संख्येत असल्यास आधी जागांची सम प्रमाणात विभागणी करावी व उरलेले अधिकचे एक पद हे पहिल्या पद भरतीमध्ये संस्थात्मक प्रवर्गासाठी उपलब्ध करुन दयावे व त्यापुढील पदभरतीमध्ये सुध्दा विषम जागा उपलब्ध असतील तर उपरोक्त प्रमाणे जागांची सम समान विभागणी केल्यावर उरलेले अधिकचे एक पद हे त्या पद भरतीमध्ये संस्थाबाहय प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. अश्या प्रकारे अधिकचे पद आळीपाळीने संस्थात्मक व संस्थाबाहय प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे असे शासनाचे निर्देश आहेत. सदर शासन निर्णय अंमलात येण्यापुर्वी ज्या पात्र अनाथांना महिला व बाल विकास विभागामार्फत अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत त्यातील अ व ब प्रवर्गाचे अनाथ प्रमाणपत्र प्राप्त अनाथांना या शासन निर्णयानुसार संस्थात्मक प्रवर्गातील अनाथ समजण्यात येईल व पुर्वीच्या क प्रवर्गाचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या अनाथांना या शासन निर्णयानुसार संस्थाबाहय अनाथ समजण्यात येईल असे नमुद आहे. उमेदवार नामे शुभम रंगराव लग्गड चेस्ट क्र. 2397 यांचे अनाथ प्रमाणपत्र पडताळणी केली असता त्यांच्याकडे क प्रवर्गाचे प्रमाणपत्र असल्याने व ते संस्थाबाहय असल्याने त्यांचे ऐवजी सदर शासन निर्णयाप्रमाणे तात्पुरत्या प्रतिक्षा यादीतील संस्थात्मक अनाथ उमेदवार कृष्णा विठ्ठल खरात चेस्ट क्र. 3242 यांची अंतिम निवड यादीमध्ये ओपन अनाथ या प्रवर्गातुन, अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहुन निवड करण्यात आली आहे व अनाथ प्रतिक्षा यादीमध्ये संस्थात्मक प्रमाणपत्र असलेले उमेदवार नामे रामेश्वर पाडळे चेस्ट क्र. 4228 हे अ.क्र. 1 वर आणि संस्थाबाहय असलेले उमेदवार शुभम लग्गड चेस्ट क्र. 2397 हे अ.क्र. 2 वर येत आहेत.

2. उमेदवार नामे **निलेश उध्दव जाधव चेस्ट क्र.** 575 **(एनटीबी)** दिनांक 18/04/2023 रोजी लेखी अर्ज सादर करुन नमुद केले की, त्यांनी एनटीबी या राखीव प्रवर्गातुन अर्ज केला असुन त्यांना शारिरीक मैदानी चाचणीमध्ये 43 व लेखी परिक्षेत 65 गुण मिळाले असुन एकुण 108 गुण मिळाले आहेत तरी दिनांक 17/04/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये त्यांना वगळण्यात आले असुन त्यांच्या ऐवजी किरण लोणारे चेस्ट क्र. 4503 याला 106 गुण असुन अर्जदार यांच्या पेक्षा 02 गुण कमी आहेत तरी किरण लोणारे यांना प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

सदर अर्जाची पडताळणी केली असता उमेदवार निलेश उध्दव जाधव चेस्ट क्र. 575 यांनी नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांना ओपन प्रवर्गातुन ग्राहय धरण्यात आले होते परंतु कागदपत्र पुर्नपडताळीमध्ये वैध नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्याने त्यांचा एनटीबी प्रवर्गात समाविष्ट केल्यांनतर गुणवत्तेप्रमाणे ते एनटीबी प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीमध्ये अ.क्र. 01 वर येत असुन, उमेदवार नामे किरण लोणारे चेस्ट क्र. 4503 हे एनटीबी प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीमध्ये अ.क्र. 02 वर येत आहे.

वर नमुद प्रमाणे बदलाची उमेदवारांनी नोंद घ्यावी

27/5/23

( गणेश शिंदे )
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग
औरंगाबाद.

Letter

Scanned by CamScanner